**रे.क्रि.केस नं. १८/ २०२२**

महाराष्ट्र शासन वि. संजय दादू खोत

**निशाण नं. ३२/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – सागर बंजरंग पवार

वय – ३७ वर्षे

धंदा – सध्या नेमणुक जोगेश्वरी पो.स्टेशन

राहणार – अंधेरी, मुंबई

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**,

१. मी कोडोली पो.स्टेशन येथे डिसेंबर २०२० ते मे २०२३ या कालावधीत कार्यरत होतो. दि.३०/०७/२०२१ रोजी मी कर्तव्यावर हजर असताना मला गुन्हा क्र.११६/२०२१ या प्रकरणाचा पुढील तपास करण्याचा लेखी आदेश प्राप्त झाला. आता मला दाखविण्यात आलेला लेखी आदेश तोच आहे. त्यावर माझे वरिष्ठ काशिद साहेब यांची सही आहे.सदर आदेश हा मला देण्यात आलेला होता. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. ३३</u>** देण्यात येत आहे. सदर आदेशासोबत मला प्रथम वर्दी प्रत, फिर्यादी जबाब, पंचनामा व त्यासोबतचा हात नकाशा, मयताची कागदपत्रे, इंन्कवेस्ट पंचनामा, शवविच्छेदन फॉर्म, मयताचे अॅडव्हान्स सर्टीफिकेट, मयतास नातेवाईकाच्या ताब्यात दिल्याची पावती, फोटो, अपघात ग्रस्त वाहनाचे आर.टी.ओ. यांचेकडील अहवाल , मयताचे मृत्यु नोंद प्रमाणपत्र, पी.एम. नोटस, वाहनाची कागदपत्र, कलम वाढ केल्याबाबतचा रिपोर्ट, वाहन ताब्यात दिले बाबतची पावती, मोटार दावे प्राधिकरण कोर्ट कोल्हापूर यांना दिलेल्या रिपोर्ट ची स्थळ प्रत, आरोपीस दिलेली कलम ४१ – अ

प्रमाणे नोटीस, जुना राजवाडा पो.स्टेशन यांचेकडील प्रत्र, लाईफलाईन हॉस्पीटल कोल्हापूर यांचेकडील वर्दी, कोडोली पो.ठाणे यांचेकडील दैनंदिन ठाणे डायरीचे उतारे, आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांना दिलेल्या रिपोर्ट ची स्थळप्रत, विमा कंपनी यांना दिलेल्या पत्राची स्थळप्रत व इतर कागदपत्र प्राप्त झाली. आता मला दाखविण्यात आलेली विमा कंपनीला पाठविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३४** देण्यात येत आहे. सदर पत्र मी विमा कंपनी यांनी वाहन क्र. एम.एच.४६.बी.एच.०५४८ या वाहनाचा विमा उतारवलेला असल्यामुळे त्याबाबत गुन्हा दाखल झाल्यामुळे मी त्यांना पत्र पाठविले होते. सदर पत्र मी एच.डी.एफ.सी जनरल इन्शुरन्स आय.आर.डी.ए.एल रजिस्टर नं.१४६ यांना पाठविले होते. सदर प्रकरणातील पुढील तपास मी करत असतेवेळी माझेकडील कागदपत्रांचे मी अवलोकन केले असता मला असे आढळून आले की, सदर ची घटना ही आरोपी संजय दादू खोत यांच्या हलगर्जीपणामुळे तसेच निष्काळजीपणामुळे मयत पांडुरंग गणपती खुटाळे यांच्या मृत्युस कारणीभुत झाल्याचे आढळून आले. सदर निष्कर्ष मला आढळून आल्यामुळे मी सदर आरोपी विरुध्द या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरणाचा तपास माझेकडे येणेपुर्वी सदर प्रकरणाचा तपास हा एन.बी.सुतार यांनी केलेला होता. या प्रकरणातील नि.३४ वरिल पत्र व न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याच्या व्यतिरिक्त अन्य तपास मी केलेला नाही. सदर संपुर्ण तपास हा एन.बी.सुतार यांनी केलेला आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री.एस.पी.लोखंडे यांनी परवानगी मागितल्यामुळे थोडया कालावधीकरिता तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

12:39:56

सही/-
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा

दिनांक. २९.०४.२०२६

13:48:03

<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री.प्रतिक पाटील यांचेमार्फत सुरु</u>

२. अपघाताची तारीख मला सांगता येईल त्याची वेळ मला सांगता येईल माझ्या माहितीनुसार अपघात दि.१६.०६.२०२१ रोजी झाला होता व त्याची फिर्याद हि दि.२२.०६.२०२१ रोजी दाखल झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर फिर्याद दाखल होणेस विलंब का झाला याबाबतचा तपास मी केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की,अपघातातील जखमी वगैरे नातेवाईक यांचा जबाब घेतला होता किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. तपास माझेकडे आलेनंतर मी घटनास्थळा ला भेट दिली होती. हे म्हणणे खरे आहे की,मी माझेकडील तपासात अपघात याच ठिकाणी झाला असे कोठेही नमूद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की,पंचनामामध्ये अपघातावेळी पावूस होता असे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की,पावूस होता असे फिर्यादी मध्ये नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळी गेलो त्यावेळी मोटारसायकल घसरल्याच्या खुन्हा पाहिले नाही. सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत किंवा कसे हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात जबाब नोंदविण्यात आले ते जखमी यांचे नातेवाईक आहेत. सदर कामी अपघात झाला त्याठिकाणी घर असणाऱ्या प्रकाश हिरवे यांचा जबात नोंदविण्यात आलेला होता किंवा कसे हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या कामी आर.टी.ओ यांचेकडून आलेला अहवाल मी पाहिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, या कामी असलेल्या अपघातग्रस्त वाहनाचा ब्रेक फेल झाला होता किंवा कसे आणी टायर फेल झाला होता किंवा कसे हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील गाडीचा वेग जास्त होता याबाबतची खात्री मी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की,खराब रस्ता किंवा पावसाळी वातावरण यामुळे गाडयांचा अपघात होवू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, या कामी घेण्यात आलेला आरोपी चा जबाब हा तपासाचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडी केवळ घसरली हा चालकाचा निष्काळाजीपणा नाही. हे म्हणणे खरे आहे की,

दि.१६ जुन रोजी अपघात झाला, दि.३० रोजी कलमवाढ अर्ज देण्यात आला या मधल्या कालावधीत माझेकडे तपास नव्हता. मी अपघातस्थळावरून हेल्मेट वगैरे जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुसऱ्या अधिकाऱ्यांने दिलेल्या कागदपत्रांवर विसंबून राहून मी दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी या प्रकरणात कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांमुळे मी दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी कोणताही निष्काळाजीपणा केलेला नसताना केवळ आरोपीला त्रास देण्याच्या हेतुन मी आरोपी विरुध्द खोटे दोषोरोप पत्र दाखल केलेले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

14:06:09

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/ –

**(के.दि.काकतकर)**

दिनांक.२९.०४.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा